माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये प्राप्त झालेली तक्रार
## तक्रार क्रमांक : ३८/२०१८

तक्रारकर्ता श्री.**महेश गंगाधर मानकर,**
रा.शिव चौक, गुरूवार बाजार, वाशिम, ता.जि.वाशिम

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी,
**कार्यालय शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद वाशिम, ता.जि.वाशिम**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
**जिल्हा परिषद वाशिम, ता.जि.वाशिम**

तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : ३०.११.२०२३

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| ०४.०८.२०१७ | -- | १०.०५.२०१८ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.३८३९/२०१४ दि.०४.०८.२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक ३०.११.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी ॲड.मिलींद देशपांडे हे उपस्थित आहेत. उत्तरवादी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र. ३८३९/२०१४) मध्ये दिनांक ०४.०८.२०१७ रोजी सुनावणी घेवून "१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.तरोळे व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.रविन ठाकुर हे सुनावणीस गैरहजर आहेत व त्यांचे खुलासे अप्राप्त आहेत. त्यामुळे त्यांना काहिही म्हणावयाचे नाही असे

समजुन कलम २०(१) नुसार त्यांना प्रत्येकी रु.५०००/- (रुपये पाच हजार फक्त) एवढी शास्ती करण्यात येते. २. शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांनी तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी श्री.व्ही.जी.लबडे व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.आर.डी.तुरणकर यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई सुरू करुन त्यासंबंधीचा अनुपालन अहवाल आयोगास त्वरीत सादर करावा. ३. सार्वजनिक प्राधिकरणाने अधिनियमाचे कलम १९(८) (ख) नुसार अपिलार्थीस रु.३०००/- (रु.तीन हजार फक्त) नुकसान भरपाई धनादेशाव्दारे अदा करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास त्वरीत सादर करावा. ४. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर निर्णयाची प्रत नोंदणीकृत डाकेने संबंधित जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी यांना पाठवावी. तसेच संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून उपरोक्त शास्तीची रक्कम त्वरीत वसूल करुन माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या संबंधित लेखाशिर्षामध्ये चलानव्दारे जमा करावी व चलानच्या प्रतीसह अनुपालन अहवाल आयोगास त्वरीत सादर करावा." असे आदेश पारित केले होते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, द्वितीय अपील क्र.३८३९/२०१४ दि.०४.०८.२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याने तक्रारकर्ता श्री.महेश मानकर यांचेवतीने कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल करण्यात आली असून यात शास्ती, नूकसान भरपाई तसेच आदेशाचे इतर निर्देशाचे अनुपालन झाले नसल्याने कठोर कार्यवाही करण्याची मागणी केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी आयोगाचे अपील दि.१०.०७.२०२३ रोजी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना सुनावणी सूचना जारी करण्यात आली असून दि.१०.०८.२०२३, दि.०५.१०.२०२३ व दि.२१.११.२०२३ रोजी सूचना जारी करण्यात आली असून त्यात पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन करण्यासंबंधित याआधिच सूचित करण्यात आले आहे. दि.२०.०१.२०१८ रोजी तक्रारकर्ता यांना नुकसान भरपाई बाबत कुठलीच कार्यवाही झाली नसल्याबाबत शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद, वाशिम यांना अवगत करण्यात आले होते. मात्र यावर कुठलीही कार्यवाही झाली असल्याचे अथवा खुलासा केला असल्याचे आढळून येत नाही. माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) व २०(२) या खालील कार्यवाही सुरु करण्यापुर्वी नैसर्गीक न्यायतत्वाला अनूसरुन कलम २० (१) मध्ये नमूद तरतुदीनूसार विद्यमान शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम तसेच तेथील जन माहिती अधिकारी यांना पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन करण्याचे व खुलासा सादर करण्याची अंतिम संधी प्रदान करण्यात येत



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती
सत्यमेव जयते

आहे. वरील कार्यवाही ४ आठवड्यात करण्यात यावी अन्यथा वरील प्राधिकरणास कुठलाच खुलासा सादर करण्यास स्वारस्य नसल्याचे गृहीत धरुन एकतर्फी कार्यवाही करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**अंतरिम आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांना खुलासा सादर करण्याची अंतिम संधी देण्यात येत असून त्यांनी ४ आठवड्याच्या आत खुलासा व अनुपालन अहवाल सादर करावा. जर खुलासा सादर न केल्यास त्यांना कोणताही खुलासा करावयाचा नाही, असे गृहीत धरून एकतर्फी कार्यवाही करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती विभाग, अमरावती

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : ३०.११.२०२३**

जावक क्रमांक ६२८ दिनांक 06 FEB 2024

Vishal D. Ingale-2023/